| MHRT050010262025 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७१/२०२५**<br>उन्नती उदय खेडेकर व.३<br>विरुध्द<br>कोणीही नाही |
| --- | --- |

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज, मुंबई विनियमन १८२७-८ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे अर्जातील कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील उदय तुकाराम खेडेकर यांचे दि.१८.११.२०२५ रोजी मौजे खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे निधन झाले आहे. तसेच उदय तुकाराम खेडेकर यांची आई छाया तुकाराम खेडेकर यांचे देखील दि.२४.०६.२०१८ रोजी निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या व्यतिरिक्त उदय तुकाराम खेडेकर यांना अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार यांना सदर वारस दाखला विविध शासकीय व निम शासकीय कार्यालयात तसेच मौजे खेड येथील मिळकतीला वारसांचे नाव दाखल करणेकरीता आवश्यक आहे. त्यामुळे मयत उदय तुकाराम खेडेकर यांचे पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे औपचारीक घोषित करुन अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून विनंती केली.

०३. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या मागणी विषयी 'दै. सागर' या वर्तमानपत्रामध्ये दि.३०.१२.२०२५ रोजी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले व अर्जदाराच्या मागणी बाबत कुणाला हरकत, आक्षेप असल्यास त्यांनी न्यायालयासमक्ष हजर होऊन नोंदवावा असे कळविण्यात आले. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होवूनही अद्याप पावेतो कोणीही या अर्जास हरकत, आक्षेप नोंदविलेला नाही. सदरचे जाहीर प्रगटनाच्या वर्तमानपत्राचा अंक निशाणी क्र.११ कडे आहे.

०४. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र.१२ वर शपथपत्र दाखल करुन त्यांचा स्वत:चा साक्षीपुरावा नोंदविला आहे. याशिवाय अर्जदाराने नि.क्र.५ सोबत उदय तुकाराम खेडेकर व छाया तुकाराम खेडेकर यांचे मृत्यु प्रमाणपत्र, अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रती व खेड येथील मालमत्तेचा कर

आकारणी उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल करून पुरावा बंद केल्याची पुरसीस नि.क्र.१३ वर दाखल केली आहे.

**०५.** मी अर्जदाराच्या वतीने वकील श्री.एच.के.वडके यांचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०६.** अर्जदाराचा अर्ज, अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि त्यांचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात व त्यापुढील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या करणांकरिता मांडत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०७.** अर्जदारांना वारसाप्रमाणपत्राच्या आधारे मयताची मिळकत त्यांच्या हक्कात किंवा नावाने करून घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. वारस प्रमाणपत्र मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगात घेता येते. माननीय मुबई उच्च न्यायालयांने ***ॲलायसीस मॅनुअल डिसुझा व इतर विरूध्द मॅरी कमला विल्यम मॅनुअल डिसूझा, २००६ (मुंबई) सी.आर. ५६*** मध्ये मांडलेले निरीक्षण असे आहे की, वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जात न्यायालयाला मयताच्या मिळकतीवरील वारसांचा अधिकार ठरविण्याची गरज नसून फक्त अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत घोषीत करावे. अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र वितरीत केले म्हणजे मयताच्या मिळकतीवर वारसांचा हक्क निर्माण होतो असा अर्थ होत नाही किंवा मयताच्या मिळकतीमध्ये एखाद्याचा अधिकार हिरावून घेतल्या जात नाही.

**०८.** तसेच, माननीय उच्च न्यायालय मुंबई यांनी ***गणपती विनायक आचवल, २०१४(६), एमएच.एल.जे. ६८३*** मध्ये नोंदविलेले निरीक्षण असे की, वारस प्रमाणपत्र दिले म्हणजे अर्जदारांना मयताचे सर्वाधिकार प्राप्त होत नाहीत. वारस प्रमाणपत्र मंजूर

झाले म्हणजे अर्जदार हे मयताचे केवळ प्रतिनिधीक वारस असल्याचे घोषीत होते. वारस प्रमाणपत्र मंजूरी हे केवळ वारसांची विद्यमान स्थिती असल्याचे औपचारीक घोषणा असते किंवा मृत्युपत्राचा व्यवस्थापक किंवा कायदेशीर प्रशासक हे न्यायालयाच्या आदेशाशिवाय मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करू शकतात.

**०९.** असे असताना एखादा व्यक्ती मुंबई विनियमन १८२७–८ च्या नियमानुसार एखादा व्यक्ती पुढील परिस्थीतीमध्ये वारसाप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे– १.जर त्याची वारस प्रमाणपत्र मिळण्याची इच्छा असेल तर, २.जर वारस म्हणून त्याच्या अधिकाराबाबत काही वाद असेल तर किंवा मयताच्या नावे असलेली मिळकत ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीला विश्वासात घेवून मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करावयाचे असल्यास वारस प्रमाणपत्राची मागणी करू शकतो. सदरील प्रकरणामध्ये अर्जदाराने वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

**१०.** अर्जदार यांनी शपथपत्राद्वारे दिलेला पुरावा व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्या वरुन, अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत उदय तुकाराम खेडेकर यांचे वारस असल्याचे दिसून येते. तसेच, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयताचे वारस नाही असा कोणाचाही आक्षेप आला नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**०१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत उदय तुकाराम खेडेकर यांचे कायदेशीर वारस आहे असे नाममात्र घोषित करण्यात येते.

**०३.** महाराष्ट्र न्याय शुल्क अधिनियम आर्टिकल १० व १२ प्रमाणे आवश्यक न्याय शूल्क मुद्रांकावर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:51:05 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | Civil M.A. No.71/2025 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 10.03.2026 |